**MHYA050040382020**

दाखल तारीख – २८/०९/२०२०
नोंदणी तारीख – २८/०९/२०२०
निकाल तारीख – २२/०४/२०२६
कालावधी – ०५व. ०६म. २४दि.

# न्यायनिर्णय

(दिनांक २२/०४/२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरूध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कायदाचे कलम १२ अ अन्वये चालविण्यात आला आहे.

२. सरकारी वकिलांचा आणि आरोपीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. सरकार पक्षाचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुराव्यांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझे निदर्शनास आले असुन त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २२/०७/२०२० रोजी संभाजी नगर येथील बौध्द विहारासमोरील रस्त्यावर येथील सार्वजनिक ठिकाणी आरोपी हे एक्का बादशहा नावाचा हारजीतचा जुगार खेळतांना मिळुन आले व महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कायदाचे कलम १२ अ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

# कारणमिमांसा

## मुद्दा क्र. १ करीता

३. सरकार पक्षाने आरोपींविरूध्द सदरचा गुन्हा सिध्द करण्यासाठी एक साक्षीदार तपासला असुन साक्षीदार धम्मदिप बंडु सुर्यवंशी हे घटनास्थळ जप्ती पंच असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत पोलिसांनी त्यांचे समक्ष पंचनामा केला नसल्याचे कथन केले आहे. तसेच पंचनाम्यातील मजकुर त्यांना माहित नाही असे सांगुन सरकार पक्षास मदत केली नाही. सदर साक्षीदाराने पोलिसांनी त्यांचे समक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा केल्याचे नाकारले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही सरकार पक्षाच्या उपयोगाची नाही.

४. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षास हे प्रस्थापित करणे गरजेचे आहे की, आरोपी हे वरळी मटका नावाचा हारजीतचा जुगार खेळत होते.

५. अभियोगपक्षाच्या कथनानुसार आरोपी हे स्वताच्या फायदयाकरीता अवैधरित्या एक्का बादशहा नावाचा जुगार खेळत होते. परंतू अभियोगपक्षातर्फे नोंदवण्यात आलेल्या पुराव्यातून आरोपींनी कोणत्या ईसमाच्या नावे कोणत्या पत्त्यावर किती रक्कम जुगारासाठी लावली होती ही बाब अभिलेखावर येवू शकलेली नाही. तसेच आरोपींनी कोणत्या इसमाकडुन पैसे घेतले तसेच कोणत्या इसमाकडुन किती रुपये घेतले याबाबत देखील कुठलाही पुरावा अभिलेखावर नोंदवण्यात आलेला

नाही. त्यामुळे आरोपी हे अवैधरीत्या एक्का बादशहा नावाचा हारजीतचा जुगार खेळत होते याबाबत संशय निर्माण होतो. वरिल सर्व विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, अभिलेखावरील पुरावा हा आरोपींविरुध्द गुन्हा निसंशयीतरीत्या सिध्द करण्यास अपुरा ठरतो. त्यामुळे मी मुददा क्रं १ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

## <u>मुद्दा क्र. २ करीता</u>

**६.** मुद्दा क्र. १ चे नकारार्थी निष्कर्ष लक्षात घेता आरोपी क्र. १ व ३ ते ५ हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरले आहेत. प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्र. २ सैयद अशपाक सैय्यद अतिउल्ला यास उपस्थित करणेकामी त्यांचेविरूध्द वेळोवेळी समन्स तसेच बिना जमानती अधिपत्र काढण्यात आले परंतु अभियोग पक्ष प्रस्तुत आरोपीस उपस्थित करू शकला नाही. वरील विवेचनावरून आरोपीविरूध्द कुठलाही सबळ पुरावा अभिलेखावर येऊ शकला नाही. तसेच सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता कोणत्या आरोपीने कोणत्या इसमाकडुन जुगार कामी पैसे घेऊन जुगार खेळला होता याबाबत कुठल्याही इसमाचे बयाण अभिलेखावर दिसुन येत नाही. अशा परीस्थितीमध्ये आरोपी क्र. २ यांचेविरूध्द सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवणे न्यायोचित होणार नाही. करीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ अन्वये आरोपी क्र. २ सैय्यद अशपाक यांचेविरूध्द सदरचे प्रकरण बंद करणे न्यायोचित होईल. प्रस्तुत प्रकरणात पोलिसांनी जुगार खेळातील ५२ गंजी पत्ते व रोख २२०/– रूपये तसेच

आरोपी क्र. १ कडुन नगदी २५०/– रूपये, आरोपी क्र. २ कडुन नगदी ४५०/– रूपये व एक मोबाईल, आरोपी क्र. ३ कडुन नगदी ६०/– रूपये, आरोपी क्र. ४ कडुन नगदी ११०/– रूपये व एक मोबाईल व आरोपी क्र. ५ कडुन नगदी ५५/– रूपये व एक मोबाईल मुद्देमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल तीन मोबाईल कागदपत्रे पडताळणी करून त्यांच्या मुळ मालकांस हस्तांतरीत करणे न्यायोचित होईल. तसेच जप्त मुद्देमाल नगदी ११४५/– रूपये हे आव्हानीत कालावधीनंतर सरकारजमा करणे न्यायोचित होईल. जप्त मुद्देमाल वरळी मटका साहित्य उपयोगशुन्य व मुल्यहिन असल्यामुळे नाश करणे योग्य होईल. प्रस्तुत न्यायनिर्णयाविरूध्द आव्हान करणेकामी आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रूपये १०,०००/– चे बंधपत्र व जातमुचलका देण्याचे निर्देष देण्यात आले आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आ दे श

१. आरोपी क्र. १ सरफराज हनिफ निरबान, आरोपी क्र. ३ विकी ऊर्फ विवेक संजय चंदन, आरोपी क्र. ४ सचिन उल्हास चव्हाण व आरोपी क्र. ५ सैय्यद सलिम सैय्यद कय्युम यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कायदा कलम १२ अ नुसारचे गुन्ह्यामधुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ अन्वये आरोपी क्र. २ सैय्यद अशपाक सैय्यद अतिउल्ला यांचेविरूध्द प्रकरण बंद करून त्यांना दोषमुक्त करण्यात येते.

३. आरोपींचे बंदपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

४. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल तीन मोबाईल कागदपत्रे पडताळणी करून त्यांच्या मुळ मालकांस हस्तांतरीत करण्यात यावे.

५. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल नगदी रू. ११४५/– हे आव्हानीत कालावधीनंतर सरकारजमा करण्यात यावे.

६. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल जुगार साहित्य हे उपयोगशुन्य व मुल्यहिन असल्यामुळे नाश करण्यात यावे.

७. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ प्रमाणे जमानतीची पूर्तता करावी.

Digitally signed by CHONDE GAJANAN GOVINDRAO
Date: 2026.04.22 18:03:19 +0530

**(जी. जी. चोंडे)**

दिनांक – २२/०४/२०२६

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी**
**न्यायालय क्र. १, पुसद**